नि.दिवाणी दावा क्र.५३/२०१६
भागिरथीबाई वि.संजय व इतर
प्रतिवादीतर्फे सा.क्र.१(नि.क्र.९२)

//०८//

<u>उलटतपास वादी तर्फे श्री. के.व्ही.बेंडकुळे वकिल यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>

**९.** मी आठवी पास आहे. माझे गाव गुंजोटी आहे. मंचक बोंडगे यांना मी ओळखतो. मी त्यांना २००७ सालापासून ओळखतो. मंचक बोंडगे सुकणी गावाचे रहिवाशी आहेत. हे खरे की, गुंजोटी व सुकणी गावे एकमेकालगत आहेत. हे खरे नाही की, मंचक बोंडगे हे माझे पाहूणे आहेत. हे खरे नाही की, त्यांचा व माझा पैशाचा व्यवहार आहे. मी भागीरथीबाई वैजनाथ चाटे, लक्ष्मण वैजनाथ चाटे यांचेकडून खरेदीपत्र करुन घेतले आहे. भागीरथी बाईचे वय किती हे मला सांगता येत नाही. तीचे वय ९० वर्षे आहे हे मला माहिती नाही. भागीरथीबाई यांना मी २००७ सालापासून ओळखतो. संजय ट्रान्सपोर्ट किनगांव यांचेकडे मी सोयाबीन पिकाची वहातूक करण्यासाठी काम करीत होतो. माझ्याकडे १० टायरच्या ११ मालवाहतूक गाडया होत्या. भागीरथीबाईला किती अपत्ये आहत हे मला माहिती नाही. वैजनाथ चाटे यांच्या बददल मला माहिती होती. भागीरथी बाई यांच्या घरी मी गेलो होतो. लक्ष्मण हा भागीरथी बाईचा मुलगा आहे. लक्ष्मण कडे एक स्कॉर्पीओ कार आणि दोन ट्रक होते. हे खरे नाही की, लक्ष्मण याच्याकडे आणि माझ्याकडे ट्रक्स असल्याने त्याच्याशी माझा संपर्क होता.

**१०.** ट्रकस असल्यामुळे भागीरथीबाई यांच्याकडे माझे येणे-जाणे होते यास माझे सांगणे की, कधीतरी होते. हे खरे नाही की, या समव्यवसायामुळे आम्ही एकमेकांना पैशाची देवाण-घेवाण करत होतो.

**११.** खरेदीच्या व्यवहाराला आमच्या मध्यस्थीला कोणीही नव्हते. आमच्या व्यवहारातील मध्यस्थ लक्ष्मण चाटे हा होता. हे खरे की, भागीरथीबाई व लक्ष्मण चाटे हे एकत्रच राहत होते. सदरचा व्यवहार भागीरथीबाई व लक्ष्मण यांच्या घरी झाला हे खरे आहे. ठरावाच्या वेळेला त्यांच्या व माझ्याशिवाय अन्य कोणीही हजर नव्हते. हे खरे की, भागीरथीबाई यांना ज्ञानोबा नावाचा मुलगा आहे. हे खरे की, आज रोजी ज्ञानोबा न्यायालयात हजर आहे व मी त्याला ओळखतो. हे खरे की, राम दत्तात्रय शिंदे, मनोहर मुरकुटे हे साक्षीदार त्यावेळी

हजर नव्हते. राम शिंदे किनगावचा आहे. मनोहर मुरकुटे हे कोणत्या गावचा आहे हे मला माहिती नाही. खरेदीपत्रावरील साक्षीदार क्रं.२ कोण आहे हे मला माहिती नाही. खरेदीपत्रावरील साक्षीदार कोण आहेत हे मला माहिती नाही. खरेदीच्या रक्कमेचा धनादेश मी लक्ष्मण व भागीरथीबाई यांना त्याच दिवशी दिला. हे खरे की, खरेदीचा करार तोंडी झाला. भागीरथीबाई व लक्ष्मण यांना अडचण होती म्हणून मी त्यांना चेक दिला. हे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीसाठी सदर धनादेश दिलेलाच नाही तर, तो माझ्या लक्ष्मणच्या व्यवहारासाठी दिलेला आहे. सदर रक्कम दिल्यावर दोन महिन्यांनी त्यांनी खरेदीपत्र करुन दिले. हे खरे की, खरेदीपत्रामाध्ये या व्यवहारापोटी दोन महिन्यापूर्वी चेक दिलेला आहे असा उल्लेख नाही. खरेदीपत्रात मोबदल्याची रक्कम रु.३,३५,०००/- आहे. खरेदीपत्रामध्ये सरकारी बाजारमुल्याचा उल्लेख नाही. वादजमीनीचा अकृषीक वापर आदेश करुन घेतलेला नाही. त्यावेळी गुंठेवारी पध्दत नव्हती व अकृषीक परवाना असेल तर खरेदीपत्र व्हायचे याबद्दल मला माहिती नाही. भागीरथीबाई ला किनगावमध्ये अंदाजे किती जमीन होती हे मला माहिती नाही. हे खरे की, खेरदीपत्रातील जमीनीमधून अहमदपूर-अंबाजोगाई रस्ता गेला आहे. या रस्त्याच्या उत्तरेला व दक्षिणेला भागीरथीबाईची जमीन आहे हे मला माहिती नाही. अहमदपूर अंबाजोगाई रस्त्याच्या उत्तरेला असलेली जमीन मी खरेदीपत्राने घेतली. या रस्त्याच्या दक्षिणेलाही भागीरथीबाईची जमीन आहे याबद्दल मला माहिती नाही. उत्तरेकडील बाजूला जमीन आहे की नाही हे मला माहिती नाही. माझ्या प्लॉटशिवाय भागीरथीबाईचे अन्य जमीन रस्त्याच्या उत्तरेला आहेत की नाही हे मला माहिती नाही. भागीरथीबाईची रस्त्याच्या दक्षिणेला असलेली २९ गुंठे जमीन अकृषीक परवान्याची आहे हे मला माहिती नाही. हे मला माहिती नाही की, रस्त्याच्या दक्षिणेला असलेली भागीरथीबाई यांची जमीन अकृषीक नाही. खरेदीपत्र करुन घेण्यासाठी मी वकीलांची नेमणूक केलेली नव्हती. प्रतिवादीने अशी वकीलांची नेमणूक केलेली नव्हती. वैजनाथ चाटे याच्या नावे असलेल्या अकृषीक परवानगीच्या आदेशाचा आधार घेऊन माझे खरेदीपत्र झाले हे मला माहिती नाही.

या खरेदीपत्रावर लक्ष्मण चाटे याची साक्षीदार म्हणून सही नाही. मी लक्ष्मणला खरेदीपत्राला साक्षीदार होण्याचे सांगितले होते त्याने नकार दिला. भागीरथीबाई वयस्कर असताना चाटेवाडी मध्ये कोणाही व्यक्तीची मी साक्षीदार म्हणून साक्ष का घेतली नाही याचे कारण मला देता येत नाही.

**(उलटतपासात प्रतिवादीला दाखवायच्या कागदपत्रांच्या नक्कला उपलब्ध न झाल्याने दिलेल्या नि ९३ वरील आदेशाप्रमाणे उलटतपास तहकुब.)**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक:१८/०४/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**